SYBMM Sem - IV April-may 2019

Paper / Subject Code: 78701 / Introduction to Journalism

वेळ. २.३० तास गुण:७५

सूचना : १) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे
२) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत

प्र १) खाली दिलेल्या परिच्छेदावरून उलट्या पिरॅमिडच्या स्वरूपात बातमी तयार करा. बातमीला योग्य ते शीर्षक द्या. (१५)

आशियातील आघाडीची आलिशान ट्रेन हा किताब सलग पाचवेळा जिंकून भारताची अग्रगण्य आलिशान ट्रेन डेक्कन ओडिसीने वर्ल्ड ट्रॅव्हल अॅवॉर्ड सोहळयात इतिहास रचला. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या (एमटीडीसी) संकल्पनेतून साकार झालेली आणि कॉक्स अॅण्ड किंग्जमार्फत चालवली जाणारी ही देशाची प्रमुख आलिशान ट्रेन ऐश्वर्यशाली प्रवास आणि उत्कृष्ट सेवांसाठी जगभरात प्रसिद्ध आहे. इंटरकॉन्टिनेन्टल ग्रॅण्ड स्टॅनफोर्ड हाँगकाँगमध्ये 3 सप्टेंबर २०१८ रोजी झालेल्या शानदार सोहळयात प्रतिष्ठेच्या पुरस्कार विजेत्यांची नावे घोषित करण्यात आली.

प्रमुख पर्यटनस्थळांचा प्रवास घडवणारी ही भारतातील एकमेव लक्झरी ट्रेन असलेली डेक्कन ओडिसी फारशा परिचित नसलेल्या देशाच्या सांस्कृतिक सुप्त पैलूंचे दर्शनही घडवते. या आलिशान भारतीय ट्रेनमधल्या सजावटीतून पारंपरिक वारसा आणि दखखन राजघराण्याची संस्कृती यांचे एकत्रित दर्शन घडते.

पारंपरिक नक्षीकाम असलेली भव्य केबिन्समुळे विदेशी पर्यटकांना व्यक्तिगत स्वरुपात महाराष्ट्राच्या प्राचीन सौंदर्याची अनुभूती मिळते. वारली कलेने सजलेली ही आलिशान ट्रेन वेगवेगळ्या राज्यांमधून देशभर धावते.

या ट्रेनमध्ये आकर्षक सजावट आणि अत्याधुनिक सोयीसुविधा असलेले चार भव्य प्रेसिडेन्शिअल सूट्स आहेत. स्वादिष्ट भोजनाचा आनंद देणारी अशी दोन रेस्टॉरंट गाडीत असून त्यांच्या माध्यमातून प्रवासादरम्यान त्या-त्या राज्यांतील स्थानिक रुचकर खाद्यपदार्थांची चव आमच्या पर्यटकांना घेता येईल. याशिवाय, पूर्ण बार, एक लाऊंज. एक स्पा आणि ब्युटी सलून देखील आहे. प्रत्येक केबिनमध्ये २४X७ वाय-फाय सुविधा, सेल फोन्स आणि एलसीडी टीव्ही अशासारखी आणखीही काही वैशिष्ट्ये या राजेशाही ट्रेनची आहेत,

वर्ल्ड ट्रॅव्हल अॅवॉर्ड हा पर्यटन उद्योगातला `ऑस्कर` मानला जातो आणि जागतिक पर्यटनातील उत्कृष्टतेचा हा गौरव आहे.

प्र २) अ) बातमीचे विविध शिरोभाग योग्य त्या उदाहरणांसहित सविस्तर स्पष्ट करा. (१५)

**किंवा**

प्र २) ब) बातमीदाराच्या दृष्टीने आवश्यक साधने कोणती असतात? (०७)

प्र २) क) जनपत्रकारितेमध्ये कोणत्या प्रकारचे धोके असतात? (०८)

प्र ३) अ) कोणत्याही बातमीचे मूलभूत घटक कोणते? (१५)

**किंवा**

प्र ३) ब) मुद्रित माध्यमांची भूमिका स्पष्ट करा. (०७)

प्र ३) क) डिजिटल युगात पत्रकारिता कशाप्रकारे कार्य करते? (०८)

प्र ४) अ) भारतीय पत्रकारितेचा इतिहास स्पष्ट करा. (१५)

**किंवा**

प्र ४) ब) छायाचित्रांची भूमिका स्पष्ट करा. (०७)

प्र ४) क) वृत्तपत्रांसाठी विविध स्रोत कसे उपयुक्त असतात ते स्पष्ट करा. (०८)

प्र ५) टीपा लिहा **(कोणत्याही ३)** (१५)

१. बीट पत्रकारिता
२. वृत्तसंस्था
३. मुद्रणाचा परिणाम
४. भारतीय वृत्त परिषद
५. बेंगॉल गॅझेट

---

SYBMM(IV)  / 15

(12)

**वेळ २.५ तास** **गुण : ७५**

सूचना :

अ. योग्य प्रश्नपत्रिका असल्याची खात्री करून घ्या

ब. सगळ्या प्रश्नांना समान गुण असून सगळे प्रश्न अनिवार्य आहेत

क. उजवीकडील आकडे गुण दर्शवितात .

प्रश्न १ संघटनात्मक रचनेचा साचा म्हणजे काय ते सांगून त्याचे फायदे तोटे लिहा तसेच जाहिरात संस्थे साठी सुयोग्य संघटनेच्या रचनेचा साचा तयार करा गुण १५

प्रश्न २ संघटनात्मक संस्कृती हि संघटनेसाठी खोप महत्वाची असते हि संघटनात्मक संस्कृती तयार कशी होते आणि कशी बदलते हे स्पष्ट करून सांगा. गुण १५

**किंवा**

अ.संघटनात्मक वर्तन स्पष्ट करून सांगा तसेच निरंकुश आणि सहाय्यक संघटनात्मक वर्तनाचा फरक स्पष्ट करून सांगा गुण १५

ब. मास्लोचा सिद्धांत आकृतीसह स्पष्ट करून सांगा गुण ७

प्रश्न ३ कार्याताण म्हणजे काय ते सांगून त्याची कारणे आणि परिणाम सांगा.तसेच कार्याताण कमी करण्याचे उपाय सांगा. गुण १५

**किंवा**

अ. गटवर्तन म्हणजे काय ते सांगून योग्य गट निवडीचे मार्ग कोणते ? गुण ८

ब. जे स्टेसी चा अभिप्रेरणेचा सिद्धांत गुण ७

प्रश्न ४ सामुहिक निर्णय प्रक्रियेचे विविध प्रकार सांगा . गुण १५

**किंवा**

अ. आदर्श नेतृत्वाचे गुणविशेष कोणते ? गुण ८

ब. ब्लेक आणि म्युटोन यांची मनेजीरिअल ग्रीड पद्धत स्पष्ट करून सांगा . गुण ७

प्रश ५ टिप लिहा ( कोणत्याही तीन ) गुण १५

i. संघटनात्मक वर्तनाची उद्दिष्ट्ये

ii. गटाचे मानदंड आणि सलग्नता

iii. आभासी संघटना

iv. सामाजिकीकरणाच्या तीन पद्धती

v. स्त्री आणि नेतृत्व

*****************



EF660AF96A6061851DC22D780B4855FC

**२½ तास** **एकूण गुण 75**

**सूचना : सूचना : सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे**
**उजवीकडील अंक गुण दर्शवतात**

1. अ व्हिडिओ डोक्युमेंट्रीमधून तुम्हाला काय कळले ? तुमच्या आवडीच्या एखाद्या विषयावर व्हिडिओ डोक्युमेंट्रीसाठी 2 कॉलम संहिता लिहा ( कालावधी ५ मिनीटे ) १५

**किंवा**

ब. स्टोरीबोर्ड म्हणजे काय ? एका काल्पनिक विषयावरील व्हिडिओसाठी स्टोरीबोर्ड तयार करा. प्रत्येक सीनसाठी कालावधी नमूद करा ( एकूण कालावधी ५ मिनीटे) १५

२. अ मुंबईतील FM वाहिनीवर लहान मुलांसाठी रेडिओ कार्यक्रम तयार करा. कार्यक्रमातील आशय,मुलांचा वयोगट,कार्यक्रमाचा हेतु आणि संभाव्य प्रयोजक या अनुषंगाने चर्चा करा.( एकूण कालावधी १० मिनीटे) १५

**किंवा**

ब. मायक्रोफोन्सचे विविध प्रकार कोणते ? उदाहरणासहित स्पष्ट करा १५

3. अ भारतातील कम्युनिटी रेडिओची भूमिका स्पष्ट करा ८

ब. रेडिओ आणि टीव्ही वरील नैसर्गिक आणि सभोवतालचा आवाज यावर चर्चा करा ७

**किंवा**

क. वेगवेगळे कॅमेरा शॉटस / अँगल्सवर चर्चा करा १५

4. अ. भारतातील दूरचित्रवाणीची झालेली क्रांती आणि विकास यावर चर्चा करा ८

ब. प्रसार भारतीची भूमिका यावर चर्चा करा ७

**किंवा**

क. टीव्ही **किंवा** रेडिओ यापैकी एकाची प्रॉडक्शन प्रक्रिया सविस्तर लिहा १५

५. टिपा लिहा ( **कोणत्याही तीन** ) १५

१. मन की बात
२. टीव्ही न्यूज
३. क्रीडा पत्रकारिता
४. स्टुडिओ सेटअप
५. ऑनलाइन एडिटिंग

---